# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ,

## अकोला (महाराष्ट्र)

विद्यापिठाचे संकेतस्थळ – http://www.pdkv.ac.in

माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम

(निम्न कृषि शिक्षण विद्याशाखा)

प्रवेश माहीती पुस्तिका
२०१५–२०१६

किंमत रु. ५०/– फक्त

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला
## माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम
## प्रवेश माहीती पुस्तीका २०१५–२०१६

**१. प्रवेशासंबंधी महत्वाच्या सुचना :**

अ) शैक्षणिक वर्ष २० जून २०१५ ते ३० एप्रिल २०१६ पंर्यत राहील.

ब) प्रशिक्षणाचे व परीक्षेचे माध्यम मराठी राहील.

क) प्रभारी अधिकारी, माळी प्रशिक्षण केंद्र, कृषि महाविद्यालय, नागपूर येथे २५ जागा विद्यावेतनासह व २५ जागा विना विद्यावेतनाच्या (नागपूर, वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली व गोंदीया जिल्हयातील रहिवाश्यांसाठी) राहतील तसेच प्रभारी अधिकारी, माळी प्रशिक्षण केंद्र, उद्यानविद्या महाविद्यालय, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथे २५ जागा विद्यावेतनासह व २५ जागा विना विद्यावेतनाच्या (अकोला, अमरावती, यवतमाळ, बुलढाणा व वाशिम जिल्हयातील रहिवाश्यांसाठी) राहतील.

ड) माळी प्रशिक्षण अभ्यासक्रमाचा अर्ज व माहीती पुस्तीका, संबंधीत माळी प्रशिक्षण केंद्राच्या कार्यालयात ठराविक तारखांना रु. ५०/– नगदी भरुन प्राप्त करता येईल.

**२. प्रशिक्षणाचा उद्येश**

अ) फळझाडे, भाजीपाला व फुलझाडे यांच्या लागवडी पध्दती आणि त्यावर रोग/किडींचा बंदोबस्त या संबंधीचे विस्तृत व प्रात्याक्षीकाभिमुख शिक्षण देणे.

ब) प्रशिक्षणार्थ्यामध्ये रोपवाटीकेची व्यवस्था, बागायती कामे व शास्त्रीय अभिवृध्दी बाबतचे कौशल्य वृद्धींगत करणे.

क) बागायत शास्त्रात मध्यस्तर कार्य करणा–या तंत्रज्ञांची गरज भागविणे.

ड) ग्रामीण युवकांमध्ये बागायती व्यवसायात आत्मविश्वास निर्माण करणे.

**३. प्रवेशाची पात्रता :**

अ) इयत्ता ९ वी उत्तीर्ण उमेदवार प्रवेशाकरीता अर्ज करण्यास पात्र ठरेल आणि इयत्ता ९ वी च्या गुणपत्रिकेत नमुद केलेले गुण विचारात घेतले जातील. नविन ि क्षण प्रणालीनुसार गुणाऐवजी श्रेणी दिली असल्यास, दोन्ही सत्रातील श्रेणी, अ–१ = ९५ : अ–२ = ८५ :, ब–१ = ७५ :, ब–२ = ६५ :, क–१ = ५५ :, क–२ = ४५ : आणि ड = ३५ : अशाप्रकारे श्रेणीचे रुपांतर गुणांत करुन गुणवत्ता यादी लावण्यात येईल. ई–१ किंवा ई–२ श्रेणी कुठल्याही एका विशयात जरी असली तरी तो उमेदवार प्रवेशाकरीता अपात्र ठरविण्यात येईल. या व्यतिरिक्त श्रेणीची पद्धत वेगळी अवलंबविण्यात आली असल्यास त्यांचे गुणांत रुपांतर करण्याकरीता नवीन सुत्र तयार करण्यात येईल. तेंव्हा इयत्ता ९ वी ची गुणपत्रिका/प्रगतीपत्रक अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

ब) उमेदवाराचे वय दिनांक १८ मे २०१५ रोजी १४ वर्षापेक्षा कमी व ३० वर्षापेक्षा जास्त नसावे.

फ) प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना प्रवेश हवा असेल तर दि. २४.०६.२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून दुपारी २.०० वाजेपर्यंत संबंधीत माळी प्रशिक्षण केंद्राच्या कार्यालयात स्व:खर्चाने हजर राहून व मुळ प्रमाणपत्र दाखवून प्रतिक्षा यादीवर सही करणे आवश्यक आहे. प्रतिक्षा यादीतील निवड झालेल्या उमेदवाराची दुसरी निवड यादी संबंधीत माळी प्रशिक्षण केंद्राचे सुचना फलकावर दि. २४.०६.२०१५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत लावण्यात येईल. प्रतिक्षा यादीतील निवड झालेल्या उमेदवारास आवश्यक फी, अनामत रक्कम संबंधीत माळी प्रशिक्षण कार्यालयात दि. २४.०६.२०१५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत भरावी लागेल.

ग) वरील अभ्यासक्रमाविषयी इतर माहीती माळी प्रशिक्षण केंद्रातून व मिळू शकेल.

## ५. प्रवेशाबाबत राखीव जागांचा तपशिल :

उमेदवाराची निवड विहीत केलेल्या राखीव जागा लक्षात घेऊन गुणवत्ता, वर्गवारी व शासन निर्णय क्र. टिईएम/१५९४/(६३२३)/ तांत्रिक शिक्षण—१ दिनांक ३ जून १९९४ तसेच शासन निर्णय क्र. CBC/1094/PK/86/MAVAK9 दिनांक १६.६.९४ अन्वये ठरविलेल्या नियमानुसार केली जाईल, तसेच शासन क्र. AGU-2195/CR-73/19-A दिनाक ३.१.२००१ नुसार निम्न कृषि शिक्षणाअंतर्गत येणा—या विविध अभ्यासक्रमाच्या (पदविपूर्व) प्रवेशासाठी खाली दर्शविलेल्या प्रत्येक प्रवर्गात ३० टक्के जागा विद्यार्थीनीसाठी आरक्षित असून त्यावर गुणानुक्रमे प्रवेश देण्यात येईल.

गुणवत्ता यादीनुसार प्रवेश प्रक्रीया केल्यानंतर जर कोणत्याही मागासवर्गीय प्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या जागापैकी काही जागा रिक्त राहील्यास, त्या जागेवर शासन निर्णय क्र.TEM-3397/12926/(9086) TE-I दिंनाक ११.७.१९९७ नुसार एकूण प्रवेश क्षमतेच्या जास्तीत जास्त २ टक्के पर्यंत विशेष मागासवर्गीय SBC) उमेदवारांना प्रवेशासाठी प्राधान्य देण्यात येईल. तसेच रिक्त जागांवर विशेष मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना कमाल २ टक्के जागांवर प्रवेश दिल्यानंतर जर काही जागा रिक्त राहील्या तर त्या जागा वरील शासन निर्णयानुसार इतर सर्व मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांची गुणवत्तेनुसार सरमिसळ करुन भरण्यात येतील.

**संवैधानिक आरक्षण :**

| | | |
|---|---|---|
| १) अनुसुचित जाती (बौध्द धर्म स्विकारलेल्या व्यक्तिसह) | :— | १३ टक्के |
| २) अनुसुचित जमाती | :— | ०७ टक्के |
| ३) विमुक्त जाती (अ) (१४ तत्सम जाती) | :— | ०३ टक्के |
| ४) भटक्या जाती (ब) (जाने. १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) | :— | २.५ टक्के |
| ५) भटक्या जमाती (क) (धनगर व व तत्सम जमाती) | :— | ३.५ टक्के |
| ६) भटक्या जमाती (ड) (बंजारी व व तत्सम जमाती) | :— | ०२ टक्के |
| ७) इतर मागासवर्गीय | :— | १९ टक्के |
| एकूण | :— | ५० टक्के |

(संवैधानिक आरक्षण कुठल्याही परिस्थितीत ५० : पेक्षा जास्त होणार नाही, याची दक्षता घ्यावी.)

## ९. इतर माहिती :

अ) विद्यापीठाने केलेले सर्व सामान्य नियम विद्यार्थ्यास बंधनकारक राहतील.

ब) निर्धारीत गणवेश विद्यार्थ्यास (नेव्ही निळा पॅन्ट आणि आकाशी निळा शर्ट) आणि विद्यार्थीनीस (आकाशी निळया रंगाची साडी/ब्लाऊज/कुर्ता/सलवार/ओढणी) वापरावा लागेल.

क) खोटे प्रमाणपत्र अथवा माहीती देउन प्रवेश प्राप्त केला आहे, असे निदर्शनास आल्यास प्रवेश रद्द करण्यात येईल.

ड) जेवणाची, राहण्याची सोय व त्याचा खर्च विद्यार्थ्यास स्वत: करावा लागेल.

ई) निम्न कृषि शिक्षण अंतर्गत विविध अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना सर्व शाळांच्या सोयीकरीता दिवाळी सणानिमित्य आठ दिवसाची सुट्टी राहील. ही सुटी दिवाळी (लक्ष्मीपूजन) चे दोन दिवस अगोदरपासून सुरु होईल.

फ) प्रशिक्षणा दरम्यान ८० % उपस्थिती असल्याशिवाय परिक्षेकरीता पात्र समजल्या जाणार नाही.

ग) कुठल्याही परिस्थितीत दुय्यम (Duplicate) दाखल्यावरुन प्रवेश दिल्या जाणार नाही, काही अपवादात्मक परिस्थितीत डुप्लीकेट प्रत विचारात घेतली जाईल तथापि, त्या सोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

१.शाळा सोडल्याचा दाखला हरवला असल्यास रु. २०/– चे स्टॅम्प पेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करावे.

२.मुळ दाखला हरवल्या बाबतची विभागीय वर्तमान पत्रातून प्रकाशित केलेली जाहीर प्रगटनाची प्रत सादर करावी.

३. मुळ शाळा सोडल्याचा दाखला हरविल्या बाबतची पोलीसात नोंदविलेल्या तक्रारीची प्रत सादर करावी.

म) विद्यार्थी प्रशिक्षण अर्धवट सोडून गेल्यास अथवा जे विद्यार्थी वर्गातील उपस्थितीच्या कमतरतेमुळे परिक्षेस बसण्यासापासून वंचित राहतील त्यांचेकडून त्यांना अदा केलेले विद्यावेतन वसुल करण्यात येईल.